# प्रकरण तिसरे

## 'पर्व' कादंबरीचे आशयसूत्र


* प्रस्तावना
* 'पर्व' लेखनाची पार्श्वभूमी
* 'पर्व' चे प्रयोजन
* 'पर्व' कादंबरीच्या आशयसूत्राची मांडणी
* 'पर्व' कादंबरीचे आशयसूत्र
* समारोप
* संदर्भसूची

## प्रस्तावना

एस. एल. भैरप्पा यांच्या 'पर्व' या कादंबरीचा आशयसूत्राचा आढावा आपण प्रस्तुत प्रकरणामध्ये घेणार आहोत. कन्नड साहित्यात नावलौकिक प्राप्त केलेल्या भैरप्पांनी साहित्यामध्ये मोठी कामगिरी बजावली आहे. मराठी साहित्यात भैरप्पांच्या अनेक कादंबऱ्या अनुवादित झाल्या आहेत. त्यातीलच 'पर्व' ही महत्त्वपूर्ण ठरलेली. महाभारत कथाभाग असणारी कादंबरी आहे. कल्पिताला दैवीकरणाला झिडकारून देण्याचे सामर्थ्य 'पर्व' च्या आशयसूत्रामध्ये असलेले दिसून येते. आशयसूत्र आणि निवेदन तंत्राच्या साच्यात घट्टपणे 'पर्व' ची रचना भैरप्पांनी केलेली आाहे. आशयसूत्राच्या आधारे महाभारताची वास्तव बाजू उलगडण्याचा भैरप्पांनी प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत कादंबरीत लेखक महाभारताच्या कथासूत्रातील अनेक पदर स्वत:च्या शैलीने विकसित करतो आहे. 'पर्व' च्या मराठी अनुवादित कादंबरीच्या क्षेत्रात कन्नड भाषेतील 'पर्व' च्या आशयसूत्राने नेमकी कोणती भर टाकली, तिचे वेगळेपण याचा आढावा आपण या प्रकरणात घेणार आहोत.

## 'पर्व' लेखनाची पार्श्वभूमी

'पर्व' ही कादंबरी कन्नड साहित्यामध्ये महत्त्वाची मानली जाते. 'पर्व' लिहिण्यामागची पार्श्वभूमी आणि प्रेरणा भैरप्पा यांनी कादंबरीच्या प्रस्तावनेत स्पष्ट केली आहे. कादंबरीविषयी सांगताना भैरप्पा म्हणतात, ''एकोणिसशे सहासष्टची गोष्ट असावी, चिकमंगळूर येथील एका सभेत 'पाहुण्यांची ओळख' करून देताना डॉ. ए. नारायणप्पा हे माझे मित्र उत्साहानं सांगते झाले, ''.......... भैरप्पांनी केवळ एवढचं लिहिलं नाही. यानंतर आपण सगळयांनी उत्कंठेन वाट पहावी, अशी महाभारतावर आधारित कादंबरी ते लिहिताहेत ....वगैरे वगैरे''[१] या घटनेनंतर काही दिवसांनी कादंबरी लेखनाची पार्श्वभूमी व इतर घटनांचा तपशील प्रदेशात भटकंती करताना भैरप्पांना असे दिसून आले की, महाभारतात उल्लेख झालेल्या बहुपतीत्त्वाची पद्धत आजही हिमालयाच्या काही भागात अस्तित्वात आहे. घरात येणारी प्रत्येक सून ही त्या घरातील

प्रत्येक भावाची पत्नी असते. या संदर्भात भैरप्पा सांगतात, ''त्या नंतरच्या प्रवासात मात्र माझं मन तिथल्या प्रत्येक स्त्रीच्या अंतर्मनातल्या द्रौपदीचा वेध घेत होतं.''[२]

भैरप्पांचे वास्तव्य दिल्लीला असताना त्यांना त्या भागात भटकंती करण्याचा छंद लागला होता. त्याच वेळी त्यांना पंजाब, हरियाना, उत्तरप्रदेश, बिहार या देशांमधून दिसून येणाऱ्या स्त्री - पुरुषांची देहयष्टी, त्यांच्या सामाजिक पद्धती आणि त्यांचे मनोधर्म अगदी बारकाईने जाणून घेतले होते. आणि त्यामधूनच पांडू, कुंती, माद्री या व्यक्तिरेखांनी त्यांच्या मनामध्ये आपले स्थान निर्माण केले होते. महाभारताचा अभ्यास करताना व्यास, कालीदास, कन्नड भाषेतील कुमारण्यास, पंप भैरप्पांनी वाचले होते. यातूनच महाभारताचे स्वरूप स्पष्ट होत गेले. भैरप्पा म्हणतात, ''त्या काळातील जीवन पद्धती, कृषी पशुपालनही व्यवसाय, लोहासारख्या धातूचा शोध आणि विकसित झालेले नवे तंत्रज्ञान, राज्यकारभाराची पद्धत, युद्धाची पद्धत, आहार विहार, धार्मिक आचरण, आर्यांमधील विविध पोट जाती, आर्येतर समाज, आर्य - आर्येत्तर समाजातील परस्पर विवाह आणि लैंगिक संबंध, तत्कालीन उत्तर भारतातील आरण्य आणि कृषी भूमीचा तपशील वगैरे गोष्टी स्पष्ट होत गेल्या. त्याच बरोबर मी त्या काळातील असल्याचा भाव दाटून येऊ लागला. या साऱ्याचा एकत्रित परिणाम म्हणून व्यासांच्या महाभारताच्या पार्श्वभूमीवर वेगळंच महाभारत माझ्यासमोर उलगडू लागलं.''[३] आणि या सर्वांमधूनच कुंती, द्रौपदी, कृष्ण, भीम या व्यक्तिरेखा सर्वसामान्य माणसांच्या व्यक्तिमत्वाची विविध रूपे आहेत. याचीच जाणीव भैरप्पा यांना झाली.

कादंबरी साकार करत असताना भैरप्पांनी प्रथम महाभारताचा कालखंड निश्चित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. कालखंड निश्चित करताना महाभारत हे इ. स. पूर्व बारावे शतक निश्चित केले आहे. कादंबरी लिहिण्याअगोदर भैरप्पांनी महाभारतकालीन अनेक स्थानांना भेटी दिल्या आहेत. कुरूक्षेत्राचे वर्णन करता असताना भैरप्पांनी अनेक गोष्टी नमूद केल्या आहेत. त्या गोष्टी भैरप्पा सांगतात, ''महायुद्धाच्या वेळी युद्धाची जागा कशी बदलत गेली, याचा सविस्तर अभ्यास करून त्यांनी स्वत:चं असं एक युद्ध चित्र तयार केले आहे. मलाही हेच हवं होतं कुरूक्षेत्राच्या सभोवताली इतिह सांगणारी

स्थळं आहेत. अभिमन्यूच्या मृत्यूची जागा, कर्णाच्या मृत्यूची जागा, आपल्या गुरूसाठी अर्जुनानं बाण मारून पाणी आणलं, ते कुठं वैगरे वगैरे''[४] हे सर्व पाहताना युद्ध किती विस्तीर्ण प्रदेशावर झाले याची कल्पना येते. 'पर्व' कादंबरीमध्ये भीष्मापासून अभिमन्यूपर्यंत अनेक लहान मोठी पात्रं एकत्र करून त्यांचे वय काय असेल, त्यावेळी कोण हयात असेल अशा अनेक गोष्टी निश्चित करण्याचा प्रयत्न भैरप्पांनी केला आहे. तत्कालीन परिस्थितीची जाणीव लक्षात घेऊन व्यक्तिरेखांच्या दोन्ही बाजू वाचकांसमोर आणण्याचा प्रयत्न 'पर्व' मध्ये केलेला आहे.

केवळ इतिहासाचा तपशील न देता आपल्याला पडलेल्या काही प्रश्नांची उकल करण्यासाठी आणि छळत असलेल्या काही भावभावनांचा मानवी जीवनाशी असलेला संबंध जाणून घेण्यासाठीच आपण ही ऐतिहासिक पार्श्वभूमी निवडली असल्याचे भैरप्पांनी लिहून ठेवले आहे. 'पर्व' लिहून झाल्यानंतर भैरप्पा म्हणतात, '' 'पर्व' नं मला नवा अनुभव दिला होता. माझा तो नवा जन्मच होता. मी कधी जन्मलो? आणखी किती जगणारं आहे? आजवर मी पाहिलं - अनुभवलं, त्याला काही अर्थ आहे काय? या तीन प्रश्नांच्या तरा माझ्या अंतर्मनात सतत झंकारत ठेवायचं काम 'पर्व' नं केले आहे, याचा मला अनुभव येत होता.''[५]

'पर्व' ही कादंबरी तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे आकलन करून साकार झालेली आहे. 'पर्व' ही महाभारत कथेचा नवा अन्वयार्थ घेऊन आलेली महाकादंबरी म्हणने रास्त ठरेल.

## 'पर्व' चे प्रायोजन

मराठी साहित्यातील ऐतिहासिक पौराणिक प्रवृत्तीच्या प्रवाहामध्ये न बसणारी 'पर्व' कादंबरी ही भैरप्पांनी लिहिली आहे. भूतकाळातील रमणीयता, उदात्तता, अद्भुतता पूर्णपणे त्यागून आणि त्याचबरोबर 'ययाती' आणि 'मृत्यूंजय' याची प्रयोजने 'पर्व' ने बाजूला करून 'पर्व' साकारली आहे. या संदर्भात पद्माकर दादेगावकर यांचे मत लक्षणीय ठरले आहे. ते म्हणतात, ''पुराणातील चमत्काराचे वास्तव स्पष्टीकरण

देणे मराठीला नवे नाही. तरीही 'पर्व' वेगळी आहे. कारण 'ययाती' वा 'मृत्यूंजय' यापेक्षा तिचे प्रयोजन वेगळे आहे. पाश्चात्त्य संस्कृतीच्या तडाखेबंद आक्रमणाखाली आमची प्राचीन संस्कृती नष्ट होते की काय या भयापोटी तिची वर्तमान काळाशी नाळ जोडून देणे आणि उदात्तता पुन: पुन: मनावर ठसविणे व त्याद्वारा आमचा नामशेष होऊ पाहणारा आत्माभिमान टिकवून धरणे हे 'ययाती' 'मृत्यूंजय' चे प्रयोजन आहे.

'पर्व' चं प्रयोजन निश्चित नाही, कारण तिच्यात आमचा भूतकाळ त्या काळातील आमची संस्कृती, भव्य - दिव्य होती हे गृहितच नाकारले आहे. आमच्या संस्कृतीचा एक मानदंड म्हणून मानल्या गेलेल्या महाभारतातील व्यक्ती निव्वळ मातीचे पाय असलेली सर्वसामान्य माणसे आहेत याच दृष्टिने 'पर्व' लिहिली गेली आहे.''[६]

भैरप्पांनी 'पर्व' मधून तत्कालीन काळाचे वास्तव आणि त्या वास्तवाला प्राप्त झालेला उदात्ततेचा रंग दिला आहे. आणि आपल्या संस्कृतीचं एक अंग होण्याअगोदरचे वास्तव 'पर्व' च्या माध्यमातून शोधण्याचा एक लक्षणीय प्रयत्न केलेला आहे.

## 'पर्व' कादंबरीच्या आशयसूत्राची मांडणी

'पर्व' ही कादंबरी कन्नड असूनही मराठी साहित्यात नवी भर टाकणारी ठरली आहे. चौदा विभागात विभागलेली ही कादंबरी महत्त्वाची मानली जाते. या सर्व भागांमध्ये केंद्रस्थानी भारतीय युद्ध आहे. आणि त्याभोवती सर्व आशयसूत्र फिरताना दिसते. रूढ परंपरागत कथाबीजाला वेगळे करून नवा अन्वय प्रस्तुत कादंबरी देते. ही कन्नड कादंबरी मराठी साहित्यात आणण्याचे महत्त्वपूर्ण काम सौ. उमा कुलकर्णी यांनी केले आहे. १९९१ मध्ये मराठी साहित्यात आलेली ही कादंबरी महत्त्वपूर्ण मानली जाते.

चौदा भागांमध्ये महाभारत कथेतील वेगवेगळ्या व्यक्तिरेखा आपल्या गतजीवनातील

घटना, प्रसंग वाचकांसमोर व्यक्त करू पाहता आहेत. असे तंत्र भैरप्पांनी 'पर्व' मध्ये स्वीकारले आहे.

## 'पर्व' कादंबरीचे आशयसूत्र

'पर्व' ही कादंबरी एकूण चौदा भागात विभागली आहे. त्याचा थोडक्यात परामर्श पुढे आपण पाहणार आहोत.

### भाग - पहिला

पहिल्या भागामध्ये महाभारत कथेतील शल्य ही व्यक्तिरेखा आपल्या समोर येते. शल्य राजा आपल्या नातीसोबत गप्पा मारत बसलेला आहे. अशी पार्श्वभूमी घेऊन कादंबरीला प्रारंभ होतो. इरावती आणि चंद्रभागा या प्रदेशात राहणाऱ्या मद्र लोकांचा राजा शल्य. हा नातीच्या / हिरण्यवतीच्या लग्नाचा विचार करताना म्हणतो, ''वीस गाड्या तांबं, पितळ, वस्त्रं - आभरणं यावीत एवढं देखणं रूप लाभलंय.''[७] या वरून मद्र देशात शुल्क घेऊन मुलीला विकले जाते. ही पद्धत त्या काळी मद्र देशात होती याची स्पष्ट कल्पना येते. शल्य राजाचा मुलगा रूक्मरथ हा हिरण्यवतीचा विवाह स्वयंवर पद्धतीने करण्याचे निश्चित करतो. पण या विवाहावर युद्धाची छाया पडते. यातूनच भैरप्पांनी कादंबरीच्या मूळ आशय सूत्राला हात घातला आहे. तत्काळात अस्तित्वात असलेले देश आणि त्या देशांचे राजे युद्धासाठी आपले सैन्य तयार करत आहेत. आणि आपण कोणाच्या बाजूने युद्धात भाग घ्यायचा याचा विचार करत आहेत याचेच चित्रण या भागात आहे.

भैरप्पांनी अनेक सूक्ष्म गोष्टी 'पर्व' मध्ये स्पष्ट केल्या आहेत. याच गोष्टीनी 'पर्व' चे आशयसूत्र महत्त्वपूर्ण बनत गेले आहे. मद्र देशातील आहार - विहार, चाली - रीती, परंपरा, पद्धती याचे चित्रण आले आहे. कौरव - पांडवांच्यात युद्ध निश्चित झाल्यानंतर धर्म - अधर्माकडे युद्ध सरकताना दिसून येते. युद्धासाठी सहाय्य मागण्यासाठी कौरव पांडवांचे दुत आपली बाजू कशी श्रेष्ठ आहे. हे मांडण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. शल्यराजाकडे सहाय्य मागण्यासाठी कौरव पक्षातील दुर्योधनाचा भाऊ दु:शासन स्वत: आलेला आहे. तेव्हा त्याने केलेले वक्तव्य हे महत्त्वपूर्ण ठरले आहे, ''मामा, पांडव तुझे भाचे आहेत, हे खरं पण आम्हीही तुझी भाचरं ना? आमच्या काकांना तू आपली बहिण दिलीस पण तिला काय सुख लाभलं सांग पाहू ! तिच्या मृत्यूला

जबाबदार आम्ही नाही. बहिणीच्या मुलांना राज्य मिळावं, अशी इच्छा तुझी असेल तर गोष्ट वेगळी आता आम्ही जरी त्यांना राज्य दिलं, तरी त्यांच्या नशीबी असलेला घोड्यांचा खरारा काही चुकणार नाही. थोरल्या तिघांनी फिरवलेल्या घोड्यांनी लीद काढायचं काम तुझ्या भाच्यावरं पडतयं. अशा वेळी तू का पांडवांची बाजू घेतोस? या युद्धात आम्ही जिंकलो, तर निश्चित आम्ही तुझ्या भाच्यांना राज्य देऊ हा दुर्योधनाचा शब्द आहे, याची खात्री असू दे. आमचं भांडण आहे, ते थोरल्या तिघांशी त्या धाकट्या दोघा सज्जनांशी नव्हे.''[८]

यातून दु:शासनाने शल्य राजाचा पाच भावंडाविषयी असणारा स्नेह भंग करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'पर्व' कादंबरीच्या पहिल्या भागामध्ये युद्धासाठी सहाय्य मिळविण्याचा प्रयत्न आणि त्यासाठी धर्म आणि अधर्माचा घेतलेला आधार याचे चित्रण आलेले आहे.

**भाग - दुसरा**

या भागामध्ये वृध्द कुंती आपल्या गतजीवनाच्या अनेक घटना गंगा नदीच्या काठावर बसून आठवण्याचा प्रयत्न करते आहे. असे चित्र सुरुवातीला येते. वास्तव जीवनाचे भान असलेली कुंती गंगा नदीलाच आयुष्याचा एक भाग बनवते. मुलांच्या वाट्याला आलेला बारा वर्षाचा वनवास आणि एक वर्षाचा अज्ञातवास ती गंगा नदीच्या काठावर बसून एकाकीपणे काढते. सुनेचा द्रौपदीचा झालेला अपमान कुंती विसरत नाही. तर त्याची सतत मुलांना आठवण करून देते. झालेल्या आपमानाचा सूड घेण्यासाठी आणि गेलेले राज्य परत मिळवण्यासाठी सतत मुलांना प्रेरणा देत राहते. मुलांवर अथांग प्रेम करणारी कुंती आयुष्यभर दु:खीच राहिली आहे. हस्तिनावतीची सून, होऊन आयुष्यभर एकाकीपण वाट्याला आलेली कुंती संयमी, धीरोदात्त असलेली या भागामध्ये पहावयास मिळते.

कुंती पांडूबरोबर विवाह झालेल्या क्षणापासून जीवनात झालेले अनेक बदल गंगा नदीच्या काठावर बसून आठवण्याचा प्रयत्न करते आहे. पौरुष्यहिन पुरुषाबरोबर

आयुष्य काढावे लागत असल्याने तिच्या मनाची झालेली अवस्था अनेक प्रसंगातून व्यक्त होते. कुंतीने कर्ण जन्माचे, पांडव जन्माचे रहस्य उलगडले आहे. दुर्वास ऋषीपासून झालेला कर्ण आणि नियोग पद्धतीने जन्माला आलेले 'धर्म', 'भीम', 'अर्जुन', हे सत्य कुंती सांगते. माद्रीला ही 'नकुल' आणि 'सहदेव' हे नियोगाने झालेली मुले हे ही कुंतीच स्पष्ट करते.

**भाग - तिसरा**

उपप्लव्य नगर हे पांडवांच्या युद्धसिद्धतेचं प्रमुख केंद्र झाले असल्यामुळे, कृष्णाचाही मुक्काम तिथेचं होता. युद्धाची तयारी करण्यासाठी उपप्लव्य नगर हे विराट राजाने पांडवांना दिलेले नगर. असहाय्य होणारा उकाडा याचे चित्रण सुरुवातीला दिसून येते. उकाडा कमी करण्यासाठी वाळ्याच्या पडद्यावर पाणी मारले जात आहे. कृष्ण भीमाला भेटून युद्धासाठी सहाय्य मागण्यासाठी घटत्कोचाकडे जाण्याचे सुचवतो. जन्मापासूनच त्याची जबाबदारी न घेता आपण त्याच्याकडे सहाय्य मागणे उचित नाही असे भीमाला वाटत राहते. पण भीमाचा सूड घेण्यासाठी अनेक राक्षस समूह दुर्योधनाला मदत करणार हे स्पष्ट असल्याने घटत्कोचाकडे सहाय्य मागण्यासाठी भीम निघाला आहे. त्याचवेळी आपल्या गतजीवनातील अनेक गोष्टी आठवण्याचा प्रयत्न भीम करतो आहे.

भीम हा युद्धामध्ये राज्य मिळवण्यासाठी न उतरता तो झालेल्या अपमानाचा सूड घेण्यासाठी युद्धात सहभागी होतो. हे त्याच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते, "धर्मराजाला पुन्हा सिंहासनावर बसायची इच्छा आहे. अर्जुनाला राज्य हवचं आहे. नकूल - सहदेवांनाही तो मोह नाही, असं म्हणता येणार नाही बारा वर्ष रानातली कंदमुळं, शिकार केलेलं मांस आणि भरपूर खस्ता खाल्या ! त्यानंतर वर्षभर कुणाच्यातरी दारात आश्रिताचं जिणं जगलो ! आत शरीरातील सुखाचा उपभोग घेण्याची शक्तीच वठून गेल्यावर ..... पण त्याला मात्र हे स्पष्टपणे ठावूक आहे! एवढं न समजण्या इतका तो मुर्ख नाही. कुत्रा संतापी तरी त्याला वास येतोच!"[१] या सर्वांमधून भीमाचा संतापी

स्वभाव दिसून येतो.

भीमाचे द्रौपदीवर नितांत प्रेम आहे. द्रौपदीच्या आठवणी बरोबर भीमाला आठवण होते ती सालकटंकटीची. हिंडिब बनात प्रथम गेल्यानंतर त्याला दिसलेली सालकटंकटी हिच्या बोलण्यात स्पष्टपणा होता हे भीमाला आठवते. सालकटंकटीची एक आठवण सांगताना भीम म्हणतो, ''माझं नाव सालकटंकटी, आम्ही राक्षसजन माझा थोरला भाऊ इथल्या राक्षस कुलाचा राजा आहे. रात्री फिरताना अकस्मात तुला पाहिलं तुला पाहताक्षणी माझ्या मनात तुझ्याविषयी अपेक्षा निर्माण झाली आहे. इथं जमिनीवर पडलेल्या प्रमाणे तू नाहीस; सुंदर राक्षसा सारखा आहेस तू माझा नवरा हो!''[१०] इतक्या स्पष्ट स्वभावाची सालकटंकटी आहे. याची जाणीव भीमाला होते. वर्षभर हिंडिब वनात राहून निघून गेलेला भीम पुन्हा हिंडिब वनाकडे चालला आहे. तेव्हा सर्व गतजीवन आठवतो आहे असे चित्रण येते.

घटत्कोचाकडे निघालेला भीमच्या मनातील भैरप्पांनी द्वंद्वं टिपले आहे. भीम म्हणतो, ''इतक्या वर्षात काहीच संबंध ठेवला नाही आणि आता त्याच्यापुढं जाऊन स्वत:ची ओळख सांगायची! 'मी तुझा नवरा...... मी तुझा बाप' म्हणून!''[११] हे सारे भीमाला असहाय्य वाटते.

अनेक प्रसंग भीम स्पष्टपणे आठवू पाहत आहे. एकचक्रा नगरीत राहत असताना रोज गाडाभर अन्न, दोन जनावरं आणि एक माणूस खाणाऱ्या बकासुराला ठार केल्याची आठवण होते. त्याच बरोबर किचकाचा वधही किती सामान्यपणे केला याचीही जाणीव होते. अनेक राक्षसांना सहजतेने अनेक कौशल्याने आपण ठार केले आहे असे भीमाला वाटते. घटत्कोचाला पाहिल्यानंतर आपलेच प्रतिरूप असल्याची जाणीव भीमाला होते. पितृधर्म आणि राजकर्तव्य यामध्ये आडकलेल्या घटत्कोचच्या मनाची झालेली अवस्था सालकटंकटी भीमाला सांगते. याच ठिकाणी हा भाग संपतो आहे.

युद्धाभोवती केंद्रित झालेले जीवन आणि त्याचबरोबर अनेक प्रसंगांना उजाळा देण्याचा प्रयत्न या ठिकाणी दिसून येतो. सालकटंकटी, घटत्कोच, द्रौपदी आणि भीम यांच्या मनाचा वेध प्रस्तुत भागामध्ये केला आहे.

**भाग - चौथा**

हिंडिब वनात सालक टंकटीला भेटण्यासाठी गेलेला भीम याची सतत होणारी आठवण याच पार्श्वभूमीवर या भागाची सुरुवात होते. तेरा वर्षाच्या प्रदीर्घ काळानंतर द्रौपदीच्या सानिध्यात आलेली तिची पाच मुले ही आपले वेगळे अस्तित्व निर्माण करत आहेत. याची जाणीव द्रौपदीला होते. असहाय्य होणारा उकाडा आणि अटळ झालेले युद्ध याचे चित्रण सुरूवातीला होते. भीमाच्या आठवणी बरोबर द्रौपदीला अनेक प्रसंगांची आठवण होते. आणि पूर्वायुष्य आठवण्याचा प्रयत्नच जणू द्रौपदी करते आहे की काय असे वाटते. अर्जुनावर प्रेम करणारी, त्याला सर्वस्व अर्पण करणारी द्रौपदी, वनवासात मात्र आपला खरा साथी हा भीमच आहे. याची जाणीव तिला होते.

लक्ष्याचा भेद करणाऱ्या अर्जुनाला पाहता क्षणी त्याच्यावर मोहून जाणारी द्रौपदी मात्र दु:खीच राहते. अर्जुनासाठी ती इतर चार जणांचा संग स्वीकारते. अशी संयमी आणि सूड अपमान या चक्रामध्ये सापडलेली द्रौपदी 'पर्व' मध्ये साकार होताना दिसते. आपल्या पाच मुलांना एकत्र बांधून ठेवण्यासाठी आणि गेलेले राज्य परत मिळविण्यासाठी कुंती द्रौपदीचा आपल्या पाचही मुलांशी विवाह करून देते करते. आर्य स्त्रीचा खरा धर्म काय आहे, हे कुंती द्रौपदीला सांगून आपल्या पाचही मुलांची शक्ती बनून राहण्याचे वचन तिच्याकडून घेते आहे. या सर्वामध्ये आडकलेल्या द्रौपदीला मात्र कोणीच समजू शकत नाही. गतजीवनातील गोष्टी, प्रसंग आठवताना वास्तव जीवनाकडे संयमाने पाहण्याचा प्रयत्न द्रौपदीचा आहे हे दिसून येते.

द्रौपदीच्या जीवनाला आणि तिच्या स्मरणात राहणारा प्रसंग म्हणजे द्युताचा. द्रुपद राजाची कन्या धृष्टद्युम्नाची बहिण, पाचजणांची पत्नी असलेली द्रौपदी दुर्योधनाच्या द्युताचे लक्ष्य बनते. वेश्या, वारांगणा म्हणून आणि एकवस्त्रा असूनही भर सभेत तिची अवहेलना केले जाते. तिला अपमान सहन करावा लागतो. हा प्रसंग स्पष्टपणे द्रौपदीच्या मनपटलावर उमटलेला आहे.

युद्धासाठी सहाय्य मिळावे म्हणून दुर्योधनाने पसरवलेल्या बातम्या द्रौपदी पर्यंत

पोहचतात. आणि राज्यासाठी होणारे युद्ध हे राज्यासाठी नसून ते धर्मसाठी होणार आहे हे स्पष्ट चित्र द्रौपदीसमोर उभे राहते. 'धर्म' या संकल्पनेला द्रौपदी 'शिकार', 'मद्यपान', 'स्त्री - लंपटपणा' आणि 'जुगार' या शब्दांच्या चौकटीमध्ये बंदिस्त करते. आणि धर्म म्हणजे काय हे आपल्या मुलांना सांगते. आर्यानी केलेली धर्माची विभागणी याची जाणीव या भागामध्ये होते. सतत गतजीवनातील प्रसंग मनामध्ये ताजे होत असताना द्रौपदी म्हणते, ''याच आठवणी आता मैत्रिणी झाल्या आहेत माझ्या न बोलावताही उगाच येतात कारणाशीवाय!''[१२]

वनवास आणि अज्ञातवास जगलेल्या जीवनाची आठवण द्रौपदीला येते. जरासंध, किचक या सारख्या दृष्टांपासून ओढवलेले प्रसंग आणि यातून बाहेर पडण्यासाठी भीमाचा साहसीपणा हेही द्रौपदीला स्पष्टपणे आठवते आहे. द्युतप्रसंगी भीम, अर्जुन, नकुल, सहदेव यांनी घेतलेल्या प्रतिज्ञा याची आठवण द्रौपदीला होते. अर्जुनावर सर्वपरीने प्रेम करणारी द्रौपदी मात्र अर्जुनाकडून दु:खीच झालेली दिसते. उलुपी, चित्रगंदा आणि अनेक स्त्रियांना भोगून स्वत:साठी अशी सुभद्राला बायको म्हणून घेऊन आल्यानंतर द्रौपदीने दाखवलेला संयमीपणा या ठिकाणी प्रखरतेने जाणवतो आहे.

सालकटंकटीला भेटण्यासाठी गेलेला भीम मात्र सतत द्रौपदीला आठवत राहतो. भीमाबरोबर जर सालकटंकटी परत आली तर ही भीतीही द्रौपदीला वाटत राहते. पण भीम आपल्याशी असे करणार नाही याचा विश्वासही तिला वाटतो आहे. याच ठिकाणी हा भाग संपतो आहे. आयुष्यभर दु:ख, अपमान, वनवास, अज्ञातवास द्रौपदी सहन करते. एक संयमी धीरोदात्त अशी द्रौपदी प्रस्तुत भागामध्ये भैरप्पांनी रेखाटली आहे.

**भाग पाचवा**

''यादवांचं सैन्य मिळविण्यासाठी दुर्योधन द्वारकेला गेल्याची बातमी हेरानं सांगितली आणि उपप्लव्य नगरीत असलेला कृष्ण, धर्म, अर्जुनादी सगळेजण विचारात पडले.''[१३] अशी या भागाची सुरुवात भैरप्पांनी केली आहे. अर्जुनाच्या जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न या भागात केला आहे. यादवंच सैन्य मिळविण्यासाठी चाललेला

दुर्योधनाचा प्रयत्न आणि यामुळे धर्म, अर्जुनादीची झालेली अवस्था पाहून कृष्ण द्वारकेला निघण्याची तयारी करतो आहे. कारण दुर्योधन आणि बलराम यांच्यामधील गुरू - शिष्याचे नाते हा महत्त्वाचा भाग कृष्णाला वाटतो. कृष्ण निघून गेल्यानंतर पाठोपाठ अर्जुन आणि सुभद्रा द्वारकेला निघतात. त्यावेळी अर्जुन आपल्या गतजीवनाची सांगड घालताना, पूर्वघटना आठवत वाचकांपुढे सर्व जीवनपट व्यक्त करताना दिसतो.

अर्जुनाचे कौशल्य, चाणाक्षबुद्धीमत्ता 'पर्व' मध्ये सूक्ष्मपणे टिपली आहे. धनुर्विद्येत श्रेष्ठ असलेल्या अर्जुनाच्या अंतर्मनाचा वेध भैरप्पांनी घेतला आहे. द्वारकेला निघालेला अर्जुन सुभद्राशी विवाह केला तिथपासून आठवण्याचा प्रयत्न करतो आहे. पण द्रौपदीपासून दुरावण्याची खंत ही त्याला वाटते आहे. तेव्हा अर्जुन म्हणतो की सुभद्राला घेऊन गेलो. आणि तिच्या बरोबर फुलणारी सारी स्वप्नं वठूनच गेली. द्रौपदीपासून क्षणाक्षणाला लांब जाणारा अर्जुन मात्र सारा दोष भीमाला देत होता. भीमाजवळ विवेकबुद्धी नाहीच असे सतत म्हणतो. द्रौपदीचे प्रेम मिळवणारा भीम म्हणून त्याचा तिरस्कार, मत्सर करतो. अशा या अर्जुनाचा मात्र धर्मावर विशेष जीव आहे.

अर्जुनाने विद्येतल्या अनेक कला संपादन केल्या आहेत. देवलोकात जाऊन धनुर्विद्येतील अनेक कौशल्य प्राप्त केली आहेत. अर्जुन म्हणजे एकाग्रता असे देवलोकात मानले जाते. 'विजय' हे बिरूद मिळवणारा मी एकटाच आहे. याचा अभिमानही त्याला वाटत होता. धनुर्विद्येतील अर्जुनाच्या कौशल्याचा प्रत्यय येतो तो द्रौपदी विवाहाच्या वेळी. याचे वर्णन अर्जुन करतो, ''लक्ष्य काय फक्त डोळ्यांनीच पहायचं, असतं? मत्स्ययंत्राचा भेद करून पांचालीला जिंकलं, ते फक्त डोळ्यांनीच वेध घेऊन ........ दृष्टि, मनगट, दंड, बोटं, एक बिंदू आणि एक क्रिया होऊन..... ''[१४] अर्जुन उठता - बसता, स्वप्नातही धनुर्विद्येचा विचार करताना दिसून येतो. गुरू द्रोणांचा विश्वास संपादन करणारा, त्यांचा आवडता शिष्य होण्याचा मान फक्त अर्जुनालाच मिळालेला आहे.

अर्जुनाने उलुपी, चित्रांगदा यांच्याशीही विवाह केलेला आहे. अनेक स्त्रियांना

मोहिनी घालणारं देखणं रूप लाभलेला अर्जुन या ठिकाणी आपल्यासमोर येतो. सर्वांशी नम्र होऊन वागणारा, मनामध्ये आत्मियता असणारा अर्जुन या भागामध्ये स्पष्ट होतो. भैरप्पांनी अर्जुनाच्या जीवनाचा वेध घेताना एक पुरुष म्हणून त्याच्याकडे पाहिले आहे. अनेक गोष्टी मध्ये रंगलेला अर्जुन अचानक पुन्हा वास्तव जीवनात प्रवेश करतो. आणि युद्धाबदल विचार करताना दिसून येतो. असे चित्रण या भागामध्ये आले आहे.

**भाग - सहावा**

युद्धासाठी सहाय्य मागण्यासाठी द्वारकेला निघालेला अर्जुन आणि द्वारकेबद्दल असणारी ओढ ही कृष्णासाठी आहे. या भागामध्ये द्वारका आणि संपूर्ण द्वारकेचे चित्र भैरप्पांनी आपल्या समोर उभे केले आहे. समुद्राकाठी वसवलेली द्वारका अनेक प्रसंगातून, वातावरणातून स्पष्ट होत जाते. या भागाची सुरुवातच समुद्र, उकाडा, लाटांचा आवाज यातून झालेली आहे. द्वारकेमध्ये राहणारा युयुधान या भागामध्ये वावरताना दिसतो. आणि त्याच्याच चिंतनातून कृष्ण, बलराम आणि इतर व्यक्तिरेखा घटना प्रसंग स्पष्ट होत जातात. कृष्णाच्या संपूर्ण जीवनाचा वेध या भागामध्ये घेतलेला आहे.

मथुरेहून समुद्राकाठी येऊन एक नवं जग उभं करण्याचे सामर्थ्य फक्त कृष्णामध्येच आहे. सर्व गोष्टीचा कर्ताच तो आहे असे नेहमी युयुधानला वाटत असते. मथुरा आणि द्वारका यामध्ये सतत तुलना करणारा युयुधान आपल्या जीवनातील अनेक गोष्टी सांगत आहे. हा जरी या भागाचा प्रारंभ असला तरी या भागाच्या केंद्रस्थानीही कौरव पांडवांचे युद्धच आहे.

दुर्योधन हा बलरामाचा शिष्य असल्याने, दुर्योधनाला सहाय्य करण्याचा विचार बलराम करतो आहे. कृष्णाविषयी बलरामाच्या मनामध्ये असणारा मत्सर वेळोवेळी दिसून येतो.हे स्पष्ट करताना युयुधान बलरामाला म्हणतो, ''दुर्योधन तुझा स्नेही आहे, तुझ्याकडून गदायुद्ध शिकलाय तो. तुझ्या मनात त्याच्याविषयी ममता आहे. शिवाय कृष्णाला विरोध करणं तुझा स्थायीभावच बनलाय!''[१५]

यादवांच्या संपन्न परिस्थितीला जबाबदार असणारा कृष्ण, सगळ्या यादवांमध्ये

विवेकी, सारं आर्य जगत कार्यमग्न करण्याची त्याची हुशारी, शिवाय जिथे वैयक्तिक जीवनातील प्रश्न येतात, तिथे मात्र कृष्ण अतिशय भावनाशील बनलेला आहे. अशी वैशिष्ट्ये कृष्णाच्या व्यक्तित्वाची दिसून येतात.

मथुरा सोडण्यापाठीमागचे मुख्य कारण म्हणजे जरासंध हा आहे. पण त्या अगोदर मथुरेवर राज्य करणारा कंस याला कृष्णाने संपवले आहे. संपूर्ण मथुरावासीयांना कंसाच्या अन्यायातून, अत्याचारातून बाहेर काढले आहे. अशा या कंसाला संपूर्ण सहाय्य हे जरासंधाचे होते. कृष्णाने मात्र झेप घेऊन गळा दाबून कंसाला मारलं ही कल्पनाच कोणी करू शकणारं नाही. असा विलक्षण संभ्रम मात्र संपूर्ण मथुरा जनतेने अनुभवला आहे. कृष्ण म्हणजे, ''कुठल्याही कठीण प्रसंगी कृष्णाची बुद्धी बधिर होत नाही. साप चावला, तरी आधी तो साप साधा आहे की विषारी आहे, याची परीक्षा घेण्याइतकी सावधानता!''[१६] असा कृष्ण युयुधानच्या चिंतनातून स्पष्ट होतो.

क्रुर कंसाच्या जीनवाचाही युयुधानने वेध घेतलेला आहे. त्यांच्या जन्मापासून तो कसा आहे हे अगदी बारकाईने युयुधानने व्यक्त केले आहे. कंसाला मारल्याने जरासंधाचा रोष हा कृष्णावरच होता. सारी मथुराच भुई सपाट करण्यासाठी जरासंधाने युद्धाची तयारी सुरू केली होती. यातून सर्वांचा जीव वाचवण्यासाठी मथुरा सोडणं गरजेचं वाटत होते. पण यातून होणारी निर्भत्सना स्वत:च्या डोक्यावर घेण्याचे आणि सर्वांचा जीव वाचवण्याचे खरे सामर्थ्य कृष्णाजवळच आहे हेच याठिकाणी दिसून येते. युयुधान हा कृष्णाचा सखा आहे. गतजीवनातील अनेक प्रसंग आठवताना युयुधानने कंस, जरासंध, कृष्ण, बलराम, सत्यकी यांच्या जीनवाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

रूक्मिणी हरणाचा प्रसंग, नरकासूराकडून अनेक स्त्रियांना सोडवून आणल्यानंतर त्यांच्याशी विवाह करणारा कृष्ण, हे प्रसंग युयुधानने स्पष्टपणे व्यक्त केले आहे. अनेक प्रदेशाची माहिती असणारा कृष्ण एकटाच आहे. अशी भावना युयुधानच्या मनामध्ये निर्माण होते. तेव्हा तो म्हणतो, ''ताम्रवणीचं माळरान, रैवतक पर्वताची लहानशी रांग त्या पलिकडच्या क्षितिजात विलीन झाली होती....... सगळं सगळं ठाऊक आहे

त्याला.''[१७]

पांडवाविषयी मत व्यक्त करताना युयुधान म्हणतो, ''पांडवांच्या हातात समृद्ध राज्य नसलं, तरी धैर्य आणि साहसी स्वभाव होता. भीमाची ताकद आणि त्वेष, अर्जुनाची धनुर्विद्या, सौम्य असले, तरी युद्धात समर्थपणे उभे राहणारे नकुल - सहदेव!''[१८] असे पांडव असले तरी त्यांना खरा आधार आहे तो कृष्णाचाच. जरासंधाच्या वधाचा प्रसंग अगदी बारकाईने स्पष्ट केला आहे. या प्रसंगातून कृष्णाच्या चातुर्याची कल्पना येते. आणि भीमाची द्वंद्वयुद्धातील चपळाई स्पष्ट होते.

प्रस्तुत भागामध्ये युयुधान अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा विलक्षण प्रयत्न करतो आहे. या भागामध्ये युयुधान संपूर्ण द्वारकाच वाचकांपूढे उभी करतो.

**भाग - सातवा**

प्रस्तुत भागामध्ये कर्णाच्या जीवनाचा वेध भैरप्पांनी घेतलेला आहे. सूतघाट, सूतजीवन जगणारी माणसे यांचे आचार - विचार वेगळे आहेत हे अगदी सूक्ष्मपणे टिपले आहे. या भागाच्या प्रारंभीच कृष्ण कर्णाच्या जन्माचा छेद घेण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा कृष्ण कर्णाला सांगतो की, ''.......... कुंती माझी आत्या आहे, हे तुला ठाऊक आहे ना? तिचा थोरला मुलगा तू ......''[१९]

कृष्णाने अनेक गोष्टी सांगून तू कुंतीचाच मुलगा आहेस हेच सत्या आहे. हे पटवून कर्णाला सांगतो. पण समोर आलेले सत्य कोणाला विचारावे या संभ्रमावस्थेत असलेला कर्ण आपल्या समोर येतो. ते आपल्याला ''अवेळी का ओरडला हा कोंबडा? आईनं का असं खोटं सांगितलं? .... छातीशी कवटाळत म्हणत होती, ''बाळा, किती किती गोड आहेस, रे! आणि मीही असेच लाड करून घेण्यासाठी तिच्या गळ्यात पडत होतो, नाही का?''[२०] यावरून स्पष्ट होते.

कृष्णाने सांगितलेले सर्व खोटे आहे. आपल्याला युद्धापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न आहे. अशी कर्ण स्वतःची समजूत घालताना दिसतो. आपल्या जन्माविषयी आईने जे सांगितले ते क्रर्ण आठवण्याचा प्रयत्न करताना म्हणतो, ''विचारीनं म्हटलं,

तर ती हयात नाही आणि पिताही जिवंत नाही, आता विचारायचं तरी कोणालां? मला फोडून काढण्यासाठी केलेलं हे कारस्थान तर नसेल? ..... एक भव्य स्वप्नं तयार करून तिनं ते माझ्या मनात रूजवलं होतं.''[२१]

सूर्यदेवाचे आपल्याला वरदान लाभले आहे, त्यातूनच आपल्याला सारी शक्ती मिळाली आहे असे कर्णाला वाटते. कर्णाच्या मनामध्ये विदुराविषयी मत्सर आहे. हे अनेक ठिकाणी दिसून येते. इतकी वर्षे कुंती इथे असून मात्र ती स्वत:हून कधीच भेटायला आली नाही असेही कर्णाला वाटते.

लहानपणापासून सूत म्हणून जगलेला कर्ण पदोपदी होणारे अपमान सहन करतो. पण दुर्योधनाने दिलेला मैत्रीचा हात कर्णाला महत्त्वाचा वाटतो. कृष्ण युद्धाची समेट घडवण्यासाठी प्रयत्न करताना त्याने प्रथम कर्णालाच जन्माचे रहस्य सांगून कोड्यात टाकले आहे. जर आपण पांडवांचा स्वीकार केला तर, ज्याने प्रेम दिले, मित्रत्व दिले, आंधळ्या धृतराष्ट्राने मुलांप्रमाणे समजले, डोळ्यावर पट्टी बांधलेल्या गांधारीने कधी दुर्योधन आणि माझ्यात वेगळेपणा दाखवला नाही या सर्वांचा घात केल्यासारखे होईल. या चक्रामध्ये सापडलेला कर्ण यातून बाहेर पडण्यासाठी प्रयत्न करतो आहे.

कुंतीने कर्णाची घेतलेली भेट हा प्रसंग अत्यंत तळमळीने उभा केला आहे. कुंती कर्णाच वर्णन करते, ''लांब बाहू, रूंद शरीरयष्ठी, मोठे खांदे, मोठे डोळे, रूंद कपाळ, गालांची ठेवण....... धर्मराजा असा नाही. भीमही असा नाही. अर्जुनाचा बांधा ..... त्याचं सगळंच वेगळं नकुल ..... सहदेव तर माद्रीची मुलं.... ''[२२]

कुंतीने स्वत: कर्णाला सत्य सांगते आणि तू माझाच मुलगा आहेस पांडवांचा मोठा भाऊ आहेस. हे सांगूनही कर्ण ठाम राहतो. आणि तुझी पाच मुले जिवंत राहतील मी किंवा अर्जुन असे कुंतीला सांगतो. या प्रसंगातून वाचकांच्या मनावर घाव घालण्याचा प्रयत्न केला गेला आहे. शेवटी कुंतीने राधेला दिलेले वचन मोडले आह ती म्हणते, ''राधे तु वारलीस, तेव्हा मी याच गावता होते. पण मन गोंधळून गेल्यामुळं त्यावेळी काय करावं, ते मला सुचलं नव्हतं माझ्या बाळाच्या आई, राधे हे घे अर्ध्य.

BARR. B... LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

तिची ओंजळ गंगेत रिकामी झाली''[२३] याच ठिकाणी हा भाग संपतो आहे. कुंती आणि कर्णाची भेट हा प्रसंग अत्यंत समर्पकपणे रेखाटला आहे.

**भाग - आठवा :**

या भागापासून खऱ्या अर्थाने युद्धाला सुरुवात होते आहे. युद्धासाठी सारे सैन्य निघाले आहे. अशी या भागाची सुरुवात होते. शल्य राजा आपल्या सैन्यासहे निघालेला आहे. स्वयंपाकाचे पदार्थ, अंथरूण - पांघरून, आवश्यक ती भांडी भरलेला शंभर एक बैलगाड्या एका ओळीने निघाल्या आहेत. पाणी बघुन तळ ठोकला जात आहे. मद्र देशातील सारे सैन्य कौरव पांडवांच्या युद्धामध्ये सामील होण्यास सज्ज झाले आहे. शल्य राजाच्या सैन्याची सारी व्यवस्था दुर्योधन पुढे येऊन करतो. आपल्या भाच्यांना नकुल सहदेवांना सहाय्य करण्यासाठी निघालेला शल्य दुर्योधनाच्या बाजूने युद्धात भाग घेतो.

राज्यासाठी होणारं युद्ध हे राज्यासाठी न होता ते धर्म - अधर्मासाठी होत आहे याची जाणीव शल्याला होते. असे चित्रण या भागामध्ये आलेले आहे. हा भाग जणू काही युद्धाची पार्श्वभूमी असल्यासारखाच वाटते आहे.

**भाग - नववा**

''सुप्रसिद्ध हस्तिनावती पाहण्याचं कु तूहल प्रत्येकाच्या मनात होतंच त्यांनी ऐकल्यापेक्षा किती तरी जुनं नगर, किती जुनं, कोण जाणे ! किती तरी चक्रवती राजांनी तिथं राज्य केलं होतं. चाळीस पिढ्यांपूर्वी उभारलेलं नगर !''[२४] असा या भागाचा प्रारंभ होतो. हस्तिनावतीवर राज्य करणाऱ्या राजांची पार्श्वभूमी या भागामध्ये व्यक्त होते.

युद्धासाठी सज्ज झालेले सैन्य यांची विभागणी या भागामध्ये दिसून येते. पांडवांच्या सैन्याचा सेनापती म्हणून धृष्टाद्युम्नाला अधिकार दिले आहेत. आणि कौरवांच्या सैन्याचे सेनापती पद भीष्मांनी स्वीकारले आहे याचे चित्रण, युद्धामध्ये

सैन्याचे केलेले विभाग आणि सैन्याची रचना ही पांडवांनी विभागलेल्या सैन्यावरून स्पष्ट होते, ''सेनेच्या अग्रभागी भीमसेन होता, म्हणे, त्याच्या मागं कवच घातलेला नकुल, सहदेव.... त्या पाठोपाठ काशीराजाचा मुलगा अभिमु, श्रेणिमान, वसुदान, शिखंडी यांच्या संरक्षणात युधिष्ठिर......''[२५] यावरून स्पष्ट होते.

युद्धामध्ये मर्यादा याव्यात म्हणून भीष्मांनी युद्धाचे नियम निश्चित केलेले आहेत कोणत्याही वेळेला युद्ध सुरू होणार असे सर्वत्र वातावर निर्माण झाले आहे. दुर्योधनाने सैन्यामध्ये पांडव हे कुरूवंशाचे नाहीत अशी दवंडी देण्यासाठी सांगितल आहे. ते, ''नियोगापासून जन्मलेले पांडव कुरू - वंशाचे नाहीत, त्यांना खांडवप्रस्थ दिलं,........... प्रत्येक सैनिकाला आणि सेनापतीला ऐकू येईल, अशी दवंडी पिटवू या.''[२६] यावरून दुर्योधनाच्या कुट बुद्धीचा आहे हा प्रत्यय येतो.

भीष्म जीवनातील अनेक गोष्टी या भागात उलगडण्याचा प्रयत्न करतो, अनेक प्रश्न निर्माण झाल्याने त्यातून बाहेर पडण्यासाठी, भीष्म कृष्णद्वैपायन याला भेटण्यासाठी त्याच्या आश्रमाकडे जातो. या ठिकाणी हा भाग संपतो आहे. युद्धाची तयारी युद्ध निश्चिती आणि सैन्यांची अवस्था या भागात टिपली आहे.

**भाग - दहावा**

युद्धाचं वातावरण आणि येणाऱ्या दवंड्या याकडे साऱ्या सैनिकांचे लक्ष वेधलेले आहे. युद्धासाठी आलेले सैन्य यांची व्यवस्था लावताना निर्माण झालेले अनेक प्रश्न यांचे वर्णन या भागात आलेले आहे. युद्ध निश्चित झाल्यानंतर दुर्योधनाने आपल्या पित्यापासून झालेल्या सूतांच्या मुलांना आपलेसे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांना बंधो म्हणून बोलवतो आहे असे चित्र स्पष्ट होते.

दुर्योधनाने दवंडी दिल्याने संभ्रमावस्थेत असलेला युयुत्सु यातून बाहेर पडण्यासाठी विदूराची भेट घेतो. आणि दुर्योधनाच्या बाजूने लढण्याऐवजी पांडवांच्या बाजूने युद्धात भाग घेतो. असे चित्रण या भागामध्ये आले आहे.

**भाग - आकरावा**

युद्धभूमीवर युद्धासाठी जमलेले सैन्य यांची, घोडे, हत्ती यांची दुर्गंधी सर्वत्र पसरली आहे. या भागाची सुरुवातच युद्धाची गांभिर्यता स्पष्ट करतो आहे. अशा या दुर्गंधी पासून सुटका करण्यासाठी द्रौणाचार्यानी राहुटी मध्ये होम हवण नित्यनियमाने करत आहेत. त्याबरोबर जुन्या आठवणी मान वर काढत आहेत. असे चित्रण आले आहे. द्रोणाचार्य या आठवणीमध्ये गुंतलेले आहेत ते म्हणतात, ''कुंडातल्या निखाऱ्यात मंद वारा घालून, त्यातला अग्नी प्रज्वलित करून त्यावर रचलेले समिधेचे छोटे छोटे तुकडे पेटवले. ऐंशी वर्ष, ............ कुठं ही गेलं, तरी घरचा अग्नी जपून घेऊन जात होतो.''[२७]

युद्ध भूमीवर पसरलेले मलमुत्र आणि जाणवणारी पाण्याची टंचाई यामुळे सारे वातावरण दुर्गंधाने भरलेले आहे. धर्म आणि अधर्म यांच्या गुंत्यामध्ये सापडलेला द्रोण अगदी सूक्ष्मपणे टिपला आहे. पांडव हे कुरूवंशाचे वंशज नाहीत. या भूमिकेवर होणाऱ्या युद्धाचा विचार करताना द्रौणाचार्यांनी अनेक गतजीवनातील गोष्टीवर प्रकाश टाकलेला आहे. द्रोण युद्धामध्ये सहभागी होतात ते द्रुपदावर सूड घेण्यासाठी असे वाटते.

सुरुवातीपासून द्रुपद राजाचा सूड घेण्याच्या विचाराने द्रोणाने हस्तिनावती मध्ये आल्यानंतर आपले वेगळे अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. भीष्माच्या सर्व नातवंडाना धनुर्विद्येत प्रविण करून द्रुपद राजाचा सूड घेतलेला आहे. अर्जुनाला धनुर्विद्येत प्रवीण करण्यासाठी एकलव्याचा हाताचा अंगठा गुरूदक्षिणा म्हणून द्रोणाने मागितली आहे. अर्जुनावर सूड घेण्यासाठी एकलव्य दुर्योधनाच्या बाजूने युद्धात सामील होतो. तेव्हा द्रोणांनी सांगितलेले सत्य हे महत्त्वपूर्ण ठरले आहे. एकलव्य म्हणतो, ''अर्जुनावर सूड घ्यायची संधी म्हणून मी या युद्धात उतरलो होतो. पण माझ्यावर अन्याय केला तो भीष्मांनी त्यांच्याच अधिपत्याखाली हे युद्ध होणार आहे. त्यांच्यावर सूड घ्यायचा असेल तर मला अर्जुनाची बाजू घ्यावी लागेल.''[२८]

शेवटी द्रोणानी युद्धातून माघार घ्यावी या मतापर्यंत येऊन पोहचतात. ते

म्हणतात, ''पांडव ज्या पद्धतीनं जन्मले, ती पद्धत न्यायसंमत आहे, असं आर्यधर्म सांगतो. पण आता आपण न्यायाच्या विरोधात उभे आहोत. मला वाटतं, आपण यांच्या बाजूनंही लढू नये आणि त्यांच्या बाजुनही जाऊ नये. त्यापेक्षा दूरवर कुंठ तरी एक आश्रम बांधून राहू या.''[२१]

याच ठिकाणी हा भाग संपतो आहे. या भागामध्ये आजवर घडलेल्या द्रौणाच्यार्याच्या जीवनाचा वेध घेतलेला आहे. द्रोणाची युद्धामध्ये सहभागी होण्याची काय भूमिका आहे. हे भैरप्पांनी स्पष्ट केले आहे.

**भाग - बारावा**

युद्धाअगोदर धर्म कोणता आणि पांडूची जन्मलेली मुलं ही आर्य कि अनार्य या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी गेलेला भीष्म हा कृष्णद्वैपायनाच्या आश्रमात पोहचलेला आहे. आश्रमातील भयान शांतता आणि कुणीतरी मरण पावल्याची चाहुल भीष्मांना लागलेली आहे. तेव्हाच भीष्मांना मृत्यूचे गांभिर्य समजले आहे.

खरा धर्म जाणनारा भीष्म हा कृष्णद्वैपायन ची भेट घेतो. आणि नियोग योग्य की अयोग्य हा प्रश्न कृष्णद्वैपायन यांना विचारतो. कुरूवंश वाढविण्यासाठी प्रयत्न करणारा भीष्म हा स्वत: नियोगासाठी कृष्णद्वैपायन यांना घेऊन जातो. तेव्हा योग्य वाटणारा निर्णय पुतण्याच्या मुलांच्या वेळी का अयोग्य वाटावा हा प्रश्न व्यास उपस्थित करतो आहे.

गतजीवनातील अनेक प्रश्नांची उत्तरे मिळवण्याचा विलक्षण प्रयत्न भीष्म करतो आहे. मृत्यू मात्र भीष्माच्या मनावर सर्वत्र व्यापून राहिला आहे. क्षणोक्षणी येणारा प्रेताला अग्नि दिल्याचा वास हा प्रत्येक वेळी मृत्यूची जाणीव करून देत होता. नियोगाचे नियमही भीष्मानेच निर्माण केले आहेत. जीवनाचा वेगवेगळ्या दृष्टिने विचार केला. तरी शेवट हा मृत्यू आहे, हे कृष्णद्वैपायन भीष्माला सांगतो. शेवटी नियोग धर्म की अधर्म या गोष्टी भीष्माला गौण वाटतात. तरीही युद्धामध्ये सेनापदी पद स्वीकारतो आहे. असा भीष्म या भागामध्ये आलेला आहे. अनेक प्रश्नांची उत्तरे मिळविण्यासाठी

गेलेला भीष्म तसाच परत येतो. कारण मरण हे निश्चित असते. गृहस्ताश्रम, ब्रह्माश्रम यातून बाहेर पडण्याचा एक मार्ग म्हणजे मृत्यू हाच आहे. हेच या भागात येते.

**भाग - तेरावा**

तेराव्या भागाभध्ये युद्धाला सुरुवात झालेली आहे. धृतराष्ट्र, गांधारी आणि विदूर यांना युद्धभूमी वरील सर्व गोष्टी संजय येऊन सांगतो आहे. असे चित्रण सूरूवातीला येते. प्रथम युद्धाला कोणी सुरूवात करायची हा प्रश्न उपस्थित असतानाच, अर्जुन युद्धातून माघार घेण्याचा प्रयत्न करतो आहे. पण कृष्णाच्या सांगण्यावरून युद्धाला तयार होतो. अशा बातम्या संजय सांगायचे काम करतो आहे. युद्धाच्या सुरुवातीला पांडवांचा होणारा पराभव हे ऐकूण धृतराष्ट्राला आनंद होतो. विजय दर्शवणारी बातमी सांगितल्याने संजयाला त्याचा मोबदला दिला जातो.

युद्धामध्ये कर्णाने भाग घेण्याचे नाकारले आहे. भीष्म जो पर्यंत सेनापती तोपर्यंत युद्ध करणार नाही अशी शपथ कर्णाने घेतली आहे. कौरव सैन्याचे सेनापती पद जरी भीष्माने स्वीकारले असले तरी, पांडवांवर नितांत प्रेम करणारा भीष्म युद्धामध्ये अनेक मर्यादा घालताना दिसतो.

या भागामध्ये दुर्योधन, विदूर, धृतराष्ट्र, गांधारी या व्यक्तिरेखांच्या जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. संजय सांगतो की, ''आज युद्धाला सुरवात होऊन चार घटका झाल्यावर पितामहांनी आपण युद्ध करत नसल्याचं सांगितलं ......... अन्न पाण्याचा त्याग करून त्यांनी देहत्याग करायचा निश्चिय केला आहे. सेनापती नसलेल्या युद्धभूमीवर कर्णानं प्रवेश केला आहे. युद्ध सुरू आहे ....... एवढं कानावर येताच मी निघालो.''[३०] ही बातमी धृतराष्ट्र लक्षपूर्वक ऐकतो आहे. दहा दिवस भीष्मांनी युद्ध केले. ते युद्धासाठी ठरवलेल्या नियमांच्या आधारे. अनेक वेळा युद्धामध्ये समेट घडावी हा प्रयत्न भीष्मांनी केलेला आहे.

पांडवांनी सुरू केलेला कौरवसैन्याचा संहार संजय सूक्ष्मपणे वर्णन करतो आहे. पांडवांनी कौरव सेनेवर सूड घेतला हे भीष्म दुर्योधनाला सांगताना म्हणतो, ''आजवरच्या

युद्धाचं विवेचन करून सांगतो, ऐक तुझी हार होत आहे....... आपलं सैन्य शत्रुपक्षाला देणाऱ्या बलरामाला धडा शिकविण्याच्या त्वेषाने तो युद्धात उतरला आहे कोण आहे तुझ्याकडे असा त्वेषानं फुललेला? एक तरी व्यक्ती दाखवून दे मला.''[३१] यातून सूडाची भावना दिसून येते.

पांडवांनी केलेल्या प्रतिज्ञा पूर्ण करण्याचा प्रयत्न या ठिकाणी दिसून येतो. द्रोणाचार्यांचा मृत्यू, अभिमन्यूचा मृत्यू, घटत्कोचाचा मृत्यू, दुर्योधनाच्या भावडांचा मृत्यू हे चित्रण अगदी सूक्ष्मपणे टिपले आहे. कर्णाच्या मृत्यूनंतर सूत म्हणून जगणारा आपला मुलगा याच्यावर क्षत्रिय पद्धतीने अत्यंसंस्कार व्हावेत अशी इच्छा कुंती व्यक्त करते पण हा प्रयत्न नि:फळ ठरलेला आहे.

कौरव सेनेचा नाश करून विजयी झालेले पांडवांचा ऐकाऐकी पराजय होतो असे वाटते. कारण पाचही मुलांना झोपेत ठार केले जाते. या ठिकाणी युद्धाचा शेवट होतो.

संपूर्ण कादंबरीमध्ये अदृश्य स्वरूपात आलेली गांधारी या भागामध्ये स्पष्ट होते. कृष्ण तिच्या डोळ्यावरची बांधलेली पट्टी काढतो आहे. आणि वास्तवतेचा स्वीकार करण्यासाठी धीर देत आहे. सर्व मुलांचा नाश झाल्यावर गांधारी पांडवांना जवळ करते. मात्र धृतराष्ट्र शेवटीही कपट साधण्याचा प्रयत्न करतो असे चित्र दिसते. शेवटी कृष्ण गांधारीला युद्धभूमीवर घेऊन जातो आहे. त्याच ठिकाणी गांधारी अंध होते. याच ठिकाणी हा भाग संपतो आहे.

युद्धभूमीवरील चित्रण तपशीलवार देण्याचा प्रयत्न या दीर्घ प्रकरणामध्ये केलेला आहे. युद्ध, संहार, मृत्यू, जय, विजय या गोष्टी केंद्रस्थानी ठेऊन हे प्रकरण त्या भोवती फिरते आहे असे वाटते.

### भाग - चौदावा

या भागामध्ये युद्धानंतरची भीषणता टिपण्याचा प्रयत्न भैरप्पांचा प्रयत्न आहे. सर्व संहाराबरोबर कुरूवंशाचाही संहार झालेला आहे. उत्तरेचं मुलं तिच्या उदरातच

मरण पावले आहे. मेलेले मुल जन्माला आलेले पाहून कुंतीने केलेला आक्रोश, सालकटंकटीला भेटण्यासाठी भीमाने केलेला आक्रोश, हिरण्यवतीचा जीव वाचवण्यासाठी चाललेला प्रयत्न, द्वारकेचा झालेला संहार कृष्ण पाहतो आहे, लोहाराच्या घरात बाळंतपणाच्या कळा देणाऱ्या लोहाराच्या बायकोचा आक्रोश, असंख्य स्त्रिया गर्भवती राहिल्या आहेत त्यांचा होणारा आक्रोश, धर्मपुढील असंख्य प्रश्न, उत्तरेला नियोग घडविण्याचा प्रयत्न पण द्रौपदीनेच कुरूवंश वाढवावा कुंतीची आशा, द्रौपदीचा नकार असे अस्पष्ट चित्र शेवटच्या भागामध्ये येते. आणि याच ठिकाणी हा भाग संपतो आहे.

**समारोप**

प्रस्तुत प्रकरणामध्ये 'पर्व' कादंबरीचे आशयसूत्र हे युद्धाला केंद्रस्थानी ठेऊन कशा प्रकारे उलगडत जाते हे पाहिले. 'पर्व' ही समृद्ध कादंबरी रेखाटताना भैरप्पांनी अनेक तंत्राचा वापर केलेला आहे. वाचकांच्या मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न आशयसूत्राच्या आधारे केला आहे. गतजीवनात घडलेल्या प्रश्नांची उत्तरे ही जीवनाच्या उत्तरार्धात शोधण्याचा प्रयत्न सर्व व्यक्तिरेखांचा आहे. असे चित्रण भैरप्पांनी केले आहे. मूळ महाभारत कथाच वाचकांच्या पुढे अगदी सूक्ष्मपणे मांडण्याचा विलक्षण प्रयत्न या ठिकाणी केला आहे.

'पर्व' ही कादंबरी आशयदृष्ट्या समृद्ध आहे. वाचकांच्या मनावर विशेष परिणाम करणारी ही कादंबरी मराठी साहित्यात बंडखोर ठरली आहे. भैरप्पांनी अनेक भागामध्ये अनेक प्रसंगावर प्रकाश न टाकता कथानक पुढे सरकवण्याची हतोटी वापरली आहे. प्रत्येक व्यक्तिरेखेच्या जीवनातील तळमळीचे प्रश्न तटस्थवृत्तने रेखाटले आहेत. हेच आशयसूत्राच्या आधारे स्पष्ट होते. पुढील प्रकरणामध्ये आपण भैरप्पांच्या 'पर्व' मधील व्यक्तिरेखा मिथकांमध्ये न आडकता त्यातून बाहेर येत वास्तवाचा स्वीकार कशा प्रकारे करतात याचा आढावा घेणार आहोत.

**संदर्भ सूची :**


१. भैरप्पा, एस. एल. : 'पर्व' (भावानुवाद : कुलकर्णी, उमा) मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पाचवी आवृत्ती २००६ पुनर्मुद्रण २००७, पृ. ५ (प्रस्तावना )

२. तत्रैव : पृ. ५

३. तत्रैव : पृ. ८

४. तत्रैव : पृ. ९

५. तत्रैव : पृ. १२

६. दादेगावकर, पद्माकर : चर्चासत्र, पंचधारा (संपा : साधले नलिनी) एप्रिल - सप्टेंबर १९९२, पृ. ७७.

७. भैरप्पा, एस. एल. : 'पर्व' (भावानुवाद : कुलकर्णी, उमा) मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पाचवी आवृत्ती २००६ पुनर्मुद्रण २००७, पृ. ३६.

८. तत्रैव : पृ. ७३

९. तत्रैव : पृ. १०८

१०. तत्रैव : पृ. ११८

११. तत्रैव : पृ. १२६

१२. तत्रैव : पृ. २१७

१३. तत्रैव : पृ. २३०

१४. तत्रैव : पृ. २४०

१५. तत्रैव : पृ. ३०६

१६. तत्रैव : पृ. ३१०

१७.	तत्रैव : पृ. ३५५

१८.	तत्रैव : पृ. ३५६

१९.	तत्रैव : पृ. ३८७

२०.	तत्रैव : पृ. ३८९

२१.	तत्रैव : पृ. ३९१

२२.	तत्रैव : पृ. ४२४

२३.	तत्रैव : पृ. ४२८

२४.	तत्रैव : पृ. ४३७

२५.	तत्रैव : पृ. ४४९

२६.	तत्रैव : पृ. ४६४

२७.	तत्रैव : पृ. ४९८

२८.	तत्रैव : पृ. ५४०

२९.	तत्रैव : पृ.५४२

३०.	तत्रैव : पृ. ६२०

३१.	तत्रैव : पृ. ६३९